**म.सं.कौं.हिं.का. अर्ज १३/२०२१**

**नि. क्र. ८१**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. ०३ याचा सरतपास शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – जमरुद अलीसाहेब अलजी,

**वय –** ४२ वर्षे, **व्यवसाय** – अध्यक्ष, जमातुल मुस्लीमीन खालचा मोहल्ला, कुरधुंडा.

**रा.** – कुरधुंडा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>तक्रारदारतर्फे साक्षीदार क्र.०३ याचा सरतपास तक्रारदारचे विधिज्ञ श्रीम. बी. एस. मुरुडकर यांचेकडून शपथेवर सुरु.</u>**

०१. अर्जदाराला मी ओळखतो. अर्जदार शेजारील गावातील आहेत. मी सा.वालाला ओळखतो. सन २०२१ मध्ये अर्जदार माझ्याकडे तक्रारी अर्ज घेऊन आले होते. तो अर्ज त्यांनी मला सचिवांकडे देण्यास सांगीतला. तो अर्ज सचिवांनी स्वीकारला. पोहोच देखील सचिवांनी दिली. मी या अर्जातील मजकुर वाचला होता.

०२. अर्ज वाचल्यानंतर आमच्या जमातीच्या मिटींगमध्ये आम्ही याबाबत चर्चा केली होती. अर्जदाराने आमच्या जमातीच्या निदर्शनास एक बाब आणली होती की, तीच्या पतीचे सुमय्या नावच्या एका महीलेशी संबंध आहेत. त्यावेळी जमातीच्या चौकशीत आमच्या निदर्शनास आले की, सुमैय्याचे लग्न आमच्या जमातीत झालेले नाही. त्यामुळे आमची जमात तीला कोणतीही विचारणा करु शकत नाही. तसेच ती आमच्या गावात देखील राहत नाही. आमच्या जमातीत लग्न झाले असेल तरच केवळ आम्हाला त्या व्यक्तीविषयी विचारणा करता येऊ शकते. ही चर्चा झाल्यानंतर आम्ही तो अर्ज निकाली काढला.

०३. साक्षीदाराला आता कागदयादी ७६ येथे दाखल दि. २२/०२/२०२१ रोजीचा तक्रारी अर्ज दाखवण्यात आला. हा तोच तक्रारी अर्ज आहे. त्यावर सचिव, जमातुल मुस्लीमीन कुरधुंडा यांची सही आहे. ती मी ओळखतो कारण कामकाजात त्यांच्या

बरोबर मी काम केलेले आहे. साक्षीदाराने सही ओळखल्याने केवळ सहीला **नि.८२** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडून –**

०४. हे म्हणणे खरे आहे की, मी जमातुल मुस्लीमीनचा अध्यक्ष असल्याबाबत कागदोपत्री पुरावा या प्रकरणात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत तक्रारी अर्जाशी माझा कोणताही प्रत्यक्ष संबंध आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.८२ येथील सही कोणाची आहे याबाबत त्या व्यक्तीचे नाव, पद कुठेही नमुद झालेले नाही. हे मला सांगता येत नाही की, अशा प्रकारची सही कोणीही करु शकतो.

०५. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासात नमुद केलेल्या मजकुरा बाबत व्यक्तीशः मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत अर्ज कधीही आमच्या कार्यालयात प्राप्त झालाच नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत अर्ज मी कधी वाचलाच नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा आहे व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.12.10 18:19:09 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – ०९/१२/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**